# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro cp.mb-vv@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव


**प्रेसनोट क्रमांक :- ५३/२०२३** **दिनांक :- १५/०२/२०२३**

## बॅकांनी सिल केलेल्या मालमत्ता / घरे स्वस्त दरात तडजोडीने मिळवुन देण्याचा बहाणा करुन सर्वसामान्य जनतेची फसवणुक करणारी सराईत टोळी गजाआड. गुन्हे शाखा, कक्ष ३ विरार युनिटची कामगिरी.

-------ooooo-------

माहे जुन २०२१ ते दिनांक २८/०३/२०२२ रोजी पावेतो फिर्यादी नामे पियुशकुमार आनंदस्वरुप दिवाण, वय ५६ वर्षे यांना व त्यांचेसह इतर ४४ लोकांना **"बिडर्स विनर्स"** पत्ता बोळिंज, विरार (पश्चिम) या बोगस कंपनीचे चालक व बनावट नामधारक आरोपीत १) प्रविण मल्हारी ननवरे , २) नितीन शर्मा, ३) राहुल भट ४) अलायदा शहा यांनी बँकेने लिलावात काढलेली मालमत्ता / घरे एन.पी.ए. तत्वावर स्वस्तात तडजोडीअंती विकण्याचे अमिष दाखवुन त्यांचा विश्वास संपादन करुन त्यांच्याकडुन एकुण ८० लाख रुपये रक्कम स्विकारली व त्यांना घर किंवा मालमत्ता न देता, कंपनी बंद करुन पळुन गेल्याने फिर्यादी यांनी त्यांची फसवणुक झालेबाबत अर्नाळा सागरी पोलीस ठाणेत दिनांक २८/०३/२०२२ रोजी दिलेल्या तक्रारीवरुन गुन्हा रजि नंबर १०९/२०२२ भा.दं.वि.सं. कलम ४२०, ४०६, ४६५, ४६७, ३४ सह महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थामधील) हितसंबधाचे संरक्षण अधिनियम १९९९ चे कलम ३, ४ अन्वये नोंद करण्यात आला होता.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील वसई, विरार परिसरात गेल्या काही महिन्यांपासुन स्वस्त दरात फ्लॅट विक्रीसाठी उपलब्ध असल्याची जाहिरात देऊन सर्वसामान्य जनतेची फसवणुक करणारी टोळी सक्रीय झाली होती. त्याअनुषंगाने पोलीस ठाणेत फसवणुकीचे गुन्हे नोंद करण्यात आले होते. सदर घटनांची वरिष्ठांनी गांभिर्याने दखल घेवुन सर्वसामान्य जनतेची सुरू असलेली फसवणुक थांबविण्यासाठी व सदर गुन्हयांना आळा घालण्यासाठी असे गुन्हे करणा-या आरोपीतांचा शोध घेण्याबाबत गुन्हे शाखा, कक्ष ३, विरार युनिटचे पोलीस अधिकारी व अंमलदार यांना सूचना दिल्या होत्या.

त्याअनुषंगाने वर नमूद गुन्हयाचा गुन्हे शाखा कक्ष ३, विरार युनिट यांनी समांतर तपास करुन तांत्रिक विश्लेषण व गोपनीय बातमीदाराकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे आरोपीत नामे १) परेवज दस्तगीर शेख ऊर्फ राहुल भट ऊर्फ पिटर सिकवेरा ऊर्फ आसिफ सैय्यद, वय ३१ वर्षे, रा. मिरारोड पुर्व, जि. ठाणे. २) साहेब हुस्सेन शेख ऊर्फ नितीन शर्मा ऊर्फ प्रशांत बंन्सल ऊर्फ सोहल शेख, वय २८ वर्षे, रा. भाईदर पश्चिम, जि. ठाणे. ३) प्रविण मल्हारी ननावरे, खारेगाव, कळवा वेस्ट, जि. ठाणे. ४) हिना इकबाल चुडेसरा ऊर्फ अलायदा शहा ऊर्फ हिना सैय्यद रा. काशिमीरा, जि. ठाणे यांना ताब्यात घेतले. त्यांचेकडे गुन्हयाचे अनुषंगाने सखोल विचारपूस करता त्यांनी अशाच प्रकारे **"लॅन्ड लॅडर"** नावे कंपनी स्थापन करुन जी.बी.रोड कापुरबावडी, जि. ठाणे येथील सुमारे ४० नागरीकांची १.२० कोटी रुपयांची व **"पाटील डिजीटल"** नावे कंपनी स्थापन करुन आझाद मैदान, मुंबई येथील सुमारे ७२ नागरीकांची १.७५ कोटी रुपयांची फसवणुक केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांना नमूद गुन्हयात अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास अर्नाळा सागरी पोलीस ठाणे करीत आहे.

नमुद आरोपी व त्यांचे इतर साथीदार यांनी आपआपसात संगनमत करुन वेगवेगळया बोगस कंपन्या स्थापन करुन बॅकांनी लिलावात काढलेली प्रापर्टी घरे स्वस्त दरात तडजोडीने मिळवुन देण्याचा बहाणा करुन वसई, विरार, मुंबई शहर व ठाणे शहर परिसरातील आत्ता पावेतो १५७ नागरीकांची ३.७५ कोटी रुपयांची फसवणुक केले असल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले आहे. त्यांच्याकडून खालील नमूद गुन्हे उघडकीस आणण्यात आले आहेत.

**:- उघडकीस आलेले गुन्हे :-**

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गु.र.क्र. | कलम |
|---|---|---|---|
| १. | अर्नाळा सागरी पोलीस ठाणे | १०९/२०२२ | भा.दं.वि.सं.कलम ४२०, ४०६, ४६५, ४६७, ३४ प्रमाणे |
| २. | आझाद मैदान पोलीस ठाणे, **(बृहन्मुंबई)** | २६९/२०२२ | भा.दं.वि.सं.कलम ४२०, ४६५, ४६६, ४६७, ४७१, ३४ प्रमाणे |
| ३. | चितळसर मानपाडा पोलीस ठाणे, **(ठाणे शहर)** | १३८/२०२१ | भा.दं.वि.सं.कलम ४२०, ४०६, ४०९, ४६५, ४६७, ४६८,४७१, ३४ प्रमाणे |

सदरची कामगिरी श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त, (गुन्हे), श्री. अमोल मांडवे सहा.पोलीस आयुक्त, (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि. प्रमोद बडाख, पो.उप.निरी.उमेश भागवत, पो.हवा. अशोक पाटील, मुकेश तटकरे, शंकर शिंदे, सचिन घेरे, सागर बारावकर, मनोज सकपाळ, अश्विन पाटील, पो.अं. राकेश पवार, सुमित जाधव, मसुब प्रविण वानखेडे, सागर सोनवणे, वंदना लिल्हारे सर्व नेमणुक गुन्हे शाखा, कक्ष ३ तसेच स.फौ. संतोष चव्हाण नेम. सायबर सेल यांनी केलेली आहे.

---ooo---